**नि. फौ. ख. क्रमांक ६५/२०२२**
**सरकार वि. मिहीर असिफअली**
**निशाणी क्र. २४**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करितो की,

**माझे नाव** – आरिफ सरफराज सैय्यद,

**वय** – ५४ वर्षे, **व्यवसाय** – ड्रायव्हर,

**राहणार** – जनता पार्क, नवापुर, ता.नवापुर,

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता वाय. आर. मोरे यांचे मार्फत सुरु.**

दिनांक १०.०३.२०२२ रोजी रात्री ०७.३० वाजेच्या सुमारास माझे भाऊ आसिफ सैय्यद व त्यांची पत्नी अनिसा यांनी मला जनतापार्क गल्ली नं. १ येथे त्यांचे राहते घरी बोलविले होते. मी तेथे गेलो असता ते माझेशी वडीलांचे मिळकतीबाबत वादविवाद करु लागले व मला सांगतिले की, आम्ही कोणाला भित नाही. आम्ही तुम्हाला हिस्सा देणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा. आमचेत वाद चालु असतांना त्यांचे शेजारी राहत असलेले सेवानिवृत्त पोलीस मलीक साहेब तेथे आले व आम्हाला सांगितले की, तुम्ही बसवुन वाद निपटुन घ्या असे सांगितले. आम्ही वाद मिटविणेसाठी बसत असतांना अनिसा आसिफ सैय्यद हिने लाकडी दांडयाने माझे डोक्याचे पुढील बाजुस मारले. त्यामुळे माझे डोक्याला दुखापत झाली व मी आरडाओरड केली असता माझा भाऊ फरवेज उर्फ पमा सरफराज सैय्यद व गल्लीतील शब्बीरभाई तेथे आले व ते मला नवापुर येथील सरकारी रुग्नालयात घेऊन गेले. तेथे मला उपचार झाला व मला पाच टाके लागले. त्यानंतर मी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद व प्रथमखबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदरील फिर्याद व प्रथमखबरी अहवालास अनुक्रमे **निशाणी क्र. २५ व २६** देण्यात येत आहे. मला अनिसाने ज्या लाकडी दांडयाने मारले होते तो लाकडी दांडा मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला प्रस्तुत प्रकरणातील जप्त लाकडी दांडा दाखविण्यात आला तो तोच आहे ज्याने मला मारहाण झाली होती. सदरील लाकडी दांडयास **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. मी आरोपींना पाहिलयास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराची उलटतपासाणी आरोपीचे विधीज्ञ आर. बी. कुलकर्णी यांचे मार्फत सुरु.**

२. मला मराठी भाषा येते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद मराठी भाषेत नोंदवुन घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जे मी मराठी भाषेत सांगितले तेच मराठी भाषेत फिर्यादीमध्ये लिहुन घेजले आहे. आम्ही सहा भाऊ व दोन बहीणी आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे शासकीय नौकरीस

नाही.  हे मला माहिती नाही की, आरोपी हे शासकीय नौकरीत ड्रायव्हर म्हणुन काम करतात किंवा कसे. मी जनतापार्क येथील गल्ली  क्र. ६ मध्ये  राहतो. माझे भाऊ आरोपी हे गल्ली क्र. १ मध्ये राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांचे राहते घर त्यांचे स्वतःचे नावावर आहे.

३.		आरोपी यांचे राहते घर माझे वडीलांचे नावावर आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, नंतर आरोपींनी त्यांचे नावावर उतारा लिहुन घेतला. हे म्हणणे खरे आहे की, माझा व आरोपीमध्ये हिस्से वाटणी बद्दल वाद नाही.

प्रश्नः	फिर्याद निशाणी क्र. २५ मधील पाचव्या क्रमांचे ओळीमधील मजकुर '' आमचे वडीलोपार्जीत घर क्र. १३ चे हिस्से वाटणीचे आमचेत भाडण चालु होते हा मजकुर पोलीसांनी लिहला की, तुम्ही तुमच्या मर्जीने लिहली आहे?

उत्तरः	मला पोलीसांनी विचारले की, तुम्ही आरोपीकडे कशासाठी गेले त्यावेळी मी सदरील बाब त्यांना सांगितली होती.

**मध्यांनाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब.**

**मध्यांनाची वेळ संपल्यामुळे उलटतपास तहकुब.**

४.		हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे घरी मी स्वतः गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे घराजवळ भरपुर लोकांची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे, भरपुर वाहनांचे येणे जाणे चालु असते, तसेच, तेथे खुप लोक बसलेले असतात व तेथे किराणा दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळा जवळ घराचे बांधाकाम चालु होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळा जवळील रस्ता अरुंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझेत घरगुती वाद असल्यामुळे आमचेत पटत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यांचे सोबत मला कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेचे वेळी घटनेचे ठिकाणी आजुबाजुला भरपुर लोक बसलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे वेळी अंधार होता. हे मला सांगता येणार नाही की, पथदिवे सायंकाळी किती वाजता सुरु होतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याने मला दोन फोन केले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यांनी जरी दोन फोन केले होते माझा फोन मी घरी विसरलो होतो म्हणुन मी फोन उचलला नाही.  आरोपी हे मला समोरुन भेटले होते म्हणुन मी त्यांचे घरी गेलो होतो.

५.		हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हे घटनेचे दिवशी कर्तव्यावर होते.  हे म्हणणे खरे आहे की,  माझे फिर्यादमध्ये ओळ क्र. ८ मध्ये नमुद केलेले वडीलांचे नावे असलेले दोन मजली घराचे वरती तु राहत आहे व खालचे घर माझे आहे'' असे मी म्हटले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी घराचा उतारा पोलीसांना दिला नव्हता. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, घर माझे वडीलांचे मालकीचे आहे. आरोपी यांनी घर त्यांचे नावावर वडील मयत झाल्यानंतर करुन घेतले होते. आरोपी क्र. १ व त्यांचे

शेजारी राहणारा मलिक पोलीस हे दोघी मला रक्त निघाल्यावर सोडवत होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेचे वेळी माझे शर्टवर खुप रक्त पडले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते शर्ट पोलीसांनी माझेकडुन जप्त करुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ वरील लाकडी दांडयावर रक्ताचे डाग दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ वरील दांडा खोटा पुरावा तयार करुन आरोपी विरुध्द खोटी तक्रार दाखल केली.

६. घटनेचे दिवशी रात्री मी फिर्याद दाखल करणेकरिता गेलो होतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मला नेमकी वेळ सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पमा सैय्यद व जावीद सैय्यद हे मला मोटारसायकलीवर बसवुन दवाखान्यात घेऊन गेले. आम्ही ट्रीपल सिट गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मुस्लीम समाजात महिला पर्दामध्ये राहतात. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, प्रत्येक महिला राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी यांचे घरी गेल्यानंतर आरोपी क्र. २ हिंस शिवीगाळ केली नाही व भांडण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही रस्तावर जातांना खाली पडलात व त्यामुळे तुमच्या डोक्याला जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे दिवशी आरोपीचे घराशेजारी मलीक म्हणुन कोणी राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुस्लीम समाजामध्ये जेठ समोर लहान भावाची पत्नी पर्दाकरुन राहते किंवा एकदम समोर येत नाही.

७. रोशन आरिफ सैय्यद उमर आरिफ सैय्यद हे माझे मुले आहेत, मिर परवेजअली मिर सरफराज अली सैय्यद हा माझा लहान भाऊ लागतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे दिवशी तुम्ही स्वतःहुन आरोपीकडे गेलो त्यांचे सोबत वाद केला व तेथुन येतांना गटारीत पडलो व तुम्हाला त्यात जखम झाली व तुम्ही आरोपींना त्रास देण्याचे हेतुने खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, माझे फिर्यादीत नमुद केलेले मिळकत बाबत मी कोणतेही कागदापत्र पोलीसांना दिले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, पोलीसांनी मागीतले असते तर दिले असते. हे म्हणणे खरे आहे की, माझी फिर्याद मला मराठी मध्ये समजावुन वाचुन दाखविली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/–xx

नवापुर

**(बी.एच. परमार)**

दिनांक – २५.११.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नवापुर.